मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व)
ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ ३०५

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र. : व.वि.श.म./वृक्षप्राधि/६०४/22/23
दिनांक : 22 / 07 /२०२२

प्रति,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मुख्यालय
वसई-विरार शहर महानगरपालिका

विषय :- स्वारस्य अभिरुची सुचना संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.
संदर्भ :- मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.१४/०७/२०२२ रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. ५९४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण १५२ उद्याने आहेत. सदर एकूण उदयानपैकी सद्या १२५ उद्याने माहिला बचत गट मार्फत सन २०१६ पासून देखभाल करण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने स्थानिक नवीन महिला बचत गट यांना उद्यान देखभाल करण्याकरीता संधी देणे कामी इच्छूक महिला बचत गट यांचे अर्ज मागविण्यासाठी जाहिर स्वारस्य अभिरुची सुचना प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

तरी सदर करण्याकरीता स्वारस्य अभिरुची सुचना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(सोबत :- स्वारस्य अभिरुची सुचनेचा मसूदा)

22/07/22

(नरेंद्र मानकर)
अधिक्षक, मुख्यालय
वृक्षप्राधिकरण/उद्यान

a/c

..., जि.पालघर, पिन- ४०१ ३०५.

दुरध्वनी :०२५०-२५२५१०५/०६/२५२३८८८/२५२३...
फॅक्स : ०२५०-२५२५१०७.

ई- मेल :vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र :व.वि.श.म / उप्रा / ५८७/२०२२
दिनांक : १४/७/२०२२

# Expression Of Interest (स्वारस्य अभिरुची)

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नोंदणीकृत अशासकिय संस्था, महिला बचतगट हयांना याद्वारे सूचीत करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात १८५ सार्वजनिक उद्याने आहेत. सदर उद्याने देखभालीसाठी देण्याची असून उद्यानात पुढील कामे करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**उद्यानामध्ये करावयाची कामे :-**

१) उद्यानाची स्वच्छता

२) उद्यान गेट वेळेवर उघडणे व बंद करणे.

३) उद्यानामध्ये झाडलोट, शोभिवंत रोपांची छाटणी/पाणी

४) उद्यानामध्ये विद्युत दिवे सुरू व बंद करणे.

५) उद्यानामध्ये कारंजे असल्यास सुरु व बंद करणे.

६) उद्यानातील खेळणी, जीम साहित्य व्यवस्थीतरित्या हाताळली जात आहेत कि नाही याकडे लक्ष ठेवणे.

७) उद्यानाबाबत काही तक्रार / सुचना असल्यास संबंधी प्रभाग समितीत लेखी स्वरुपात देण्यात यावी.

उद्यानामध्ये महापालिकेकडून पुढीलप्रमाणे व्यवस्था पूरविण्यात येईल.

१) उद्यानासाठी पाण्याची व्यवस्था

२) उद्यानामध्ये वृक्ष लागवड

३) खत, लाल माती पुरवठा वगैरे

४) उद्यानामध्ये वीज व्यवस्था

ज्या नोंदणीकृत संस्था, महिला बचत गटाचे अर्ज मंजूर होतील अशा गटांना देखभाली साठी योग्य असे अनुदान व त्या उद्यानात व्यवसायासाठी स्टॉलसाठी परवानगी देण्यात येईल.

इच्छुकांनी आपले अर्ज दि.२९ / ०७ / २०२२ पर्यंत उद्यान/वृक्षप्राधिकरण विभाग,मुख्यालय तिसरा मजल्यावर समक्ष सादर करावेत. उद्यानाची यादी पाहण्यासाठी उद्यान/वृक्षप्राधिकरण विभाग,मुख्यालय येथे उपलब्ध ठेवलेली आहे.

महिला बचत गटास प्राधान्य देण्यात येईल.

कोणतेही अर्ज स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.

(नयना ससाणे)
उप-आयुक्त
तथा वृक्षअधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका